# नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, ३ रा मजला, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक १८/०२/२०१५.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **फेब्रुवारी महिन्याची तिसरी सर्वसाधारण सभा, शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता** बेलापूर, भुखंड क्रमांक ०१, सेक्टर १५ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील ५ व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**१.** मनपाचा सन २०१४-२०१५ चा सुधारीत आणि सन २०१५-२०१६ चा अर्थसंकल्प "अ" आणि "क."

**२.** परिवहन उपक्रमाचा सन २०१४-२०१५ चा सुधारीत आणि सन २०१५-२०१६ चा अर्थसंकल्प "ब."

**३.** शिक्षण मंडळाचा सन २०१४-२०१५ चा सुधारीत आणि सन २०१५-२०१६ चा अर्थसंकल्प.

**४.** वृक्षप्राधिकरणाचा सन २०१४-२०१५ चा सुधारीत आणि सन २०१५-२०१६ चा अर्थसंकल्प.

**५.** प्रश्नोत्तरे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

**६.** सी.बी.डी. बेलापूर सेक्टर-१५ अे व किल्ले गावठाण या क्षेत्रामध्ये पाणीपुरवठा करण्यासाठी मुख्य जलवाहीनीवर नेरुळ सेक्टर ५० येथून ३०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी पुरविणे व टाकणे.

**७.** सी.बी.डी. बेलापूर सेक्टर-३अ येथील राजीव गांधी क्रीडा संकुलातील विविध स्थापत्य कामे करणे.

**८.** तुर्भे सेक्टर २१ येथील जलनिःस्सारण केंद्राची पुर्नबांधणी करणे या कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

**ठरावाच्या सूचना :**

**९ ते ११. श्री. चंद्रकांत रामदास पाटील, यांजकडून :-**

**(९)** प्र. क्र. २२, अडवली-भुतवली येथील श्री. सुधाकर खुलात यांच्या घरापासून ते रवी खुलात यांच्या चाळीपर्यंत गटारे दुरुस्ती करणे, तसेच अडवली-भुतवली गावातील होळीच्या मैदानात सुशोभिकरण करुन तेथे इंन्टरब्लॉक बसविणे. **(१०)** प्र. क्र. २२, महापे गावातील स्मशानभुमीपासून ते हरिप्रिया हॉटेल पर्यंत गटारे बांधणे. **(११)** प्र. क्र. २२, महापे गावातील सतीश पाटील यांच्या घरापासून ते MBP राजेश देशमुख घरापर्यंत गटारे बांधणे.

**१२ ते १४. श्री. बाळकृष्ण चाहू पाटील, यांजकडून :-**

**(१२)** प्र. क्र. २० अंतर्गत असलेल्या खेळायच्या मैदानाला संरक्षणभिंत बांधणे व प्रवेशद्वार कमान करुन त्यावर नांव देणे, अंतर्गत भागात सुशोभिकरण करणे. **(१३)** नवी मुंबईतील नागरिकांना पाणी पुरवठा नळ जोडणी करिता पुरावा म्हणून १९९५ ची घरपट्टी मागता, ही अट ठेवता, ती न ठेवता सद्यपरिस्थितीतील कागदपत्रे पाहणी करुन सर्वांना नळ जोडणी करावी, जेणेकरुन पाणी चोरी होणार नाही. **(१४)** नवी मुंबईतील स्थानिक प्रकल्पग्रस्तांना देण्यात येणा-या पाणीपट्टीत व घरपट्टीतील व्याज कमी करुन (वगळून) उर्वरीत रक्कम भरण्यास मुभा द्यावी, जेणेकरुन कुणाचीही थकबाकी राहणार नाही व त्यांनाही दिलासा मिळेल, आपल्या महसुलातही त्वरीत वाढ होईल.

**मा. महापौरांच्या आदेशावरून,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक १८ फेब्रुवारी २०१५.**